**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक २३/२०१९** **दिनांक १९/०३/२०१९** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/०३/२०१९ ते १९/०३/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/०३/२०१९ सकाळी ८:३० पासून २४/०३/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१३/०३** | **१४/०३** | **१५/०३** | **१६/०३** | **१७/०३** | **१८/०३** | **१९/०३** | | **२०/०३** | **२१/०३** | **२२/०३** | **२३/०३** | **२४/०३** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.५ | ३०.४ | ३२.१ | ३४.८ | ३४.५ | ३२.० | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३२ | ३२ | ३२ | ३४ |
| १५.० | १५.५ | १४.६ | १४.० | १४.१ | १३.५ | - | **किमान तापमान (अं.से)** | १९ | १९ | १९ | २० | २० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | १ | १ | ० | २ | १ |
| ९० | ८३ | ७२ | ७९ | ८९ | ८९ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५७ | ६८ | ६४ | ५९ | ५३ |
| ५९ | ७१ | ४० | ४५ | ४५ | ५९ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३९ | ४३ | ४५ | ४२ | ४१ |
| ४.८ | ५.२ | ५.२ | ४.३ | ४.० | ४.२ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १५ | ११ | १७ | २० | १८ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | वा.उ. | वा.उ. | वा.उ. | वा.उ. | नै. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०७१.८ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २० ते २४ मार्च,२०१९ पर्यत वाऱ्याचा वेगात वाढ होण्याची शक्यता आहे.**

**सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा दर्शविण्यात आला आहे तसेच प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मध्यम ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भुईमुग | शेंगा अवस्था | • भुईमुग पिकावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण किंवा ०.२ टक्के मॅन्कोझेब किंवा ०.१ टक्का कार्बेन्डाझीम यापैकी एका बुरशीनाशकाची फवारणी १० दिवसांच्या अंतराने तीन वेळा करावी.<br>• बाष्पीभवनामध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पिकास जमिनीच्या मगदुरानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी दयावे. |
| आंबा | फलधारणा अवस्था | • आंबा पिकामध्ये भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक प्रति लिटर २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी व फळांची प्रत सुधारण्यासाठी फळे वाटाणा, गोटी व सुपारी एवढी असताना १ टक्के पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.<br>• तापमानातील होणाऱ्या बदलामुळे आंब्याची फळगळ होण्याची शक्यता आहे. फळगळ कमी करण्यासाठी फळधारणा झाल्यावर पाण्याच्या उपलब्धतेनुसार आंब्याच्या झाडास १५० ते २०० लिटर पाण्याच्या ३ ते ४ पाळ्या १५ दिवसांच्या अंतराने दयाव्यात आणि झाडाच्या बुंध्याभोवती आच्छादनाचा वापर करावा.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| काजू | फलधारणा व पक्वता | • काजूमध्ये फळावर फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ टक्के प्रवाही २.५ मि. ली. किंवा थायेमेथॉक्झाम २५ टक्के २ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.(सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत)<br>• काजू पिकामध्ये काही ठिकाणी काढणी योग्य बी तयार झालेली आहेत. तयार झालेल्या बिया बोंडापासून वेगळ्या करून बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवाव्यात. तसेच विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे काजू बोंडापासून विविध टिकावू पदार्थ तयार करावेत.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा. |
| नारळ | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, नारळ बागेत ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांना काठीचा आधार दयावा तसेच कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून पहिली दोन वर्षे रोपांना वरून सावली करावी. |
| सुपारी | - | • तापमानात वाढ संभवत असल्याने, सुपारी बागेत ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| मसाले पिके | काढणी | • काळीमिरीच्या घोसातील १ ते २ दाणे पिवळे किंवा तांबडे लाल होताच मिरीची काढणी करावी व दुसऱ्या दिवशी मिरीचे दाणे घोसापासून वेगळे करून बांबूच्या करंडीत किंवा मलमलच्या कापडात भरून उकळत्या पाण्यात एक मिनिट बुडवावेत व उन्हामध्ये ३ ते ४ दिवस चांगले वाळवावे. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | फलधारणा | • उन्हाळी भेंडी पिकाचे तुडतुड्यापासून नियंत्रण करण्यासाठी पेरणीनंतर १० ते १५ दिवसांनी फोरेट १० जी १० किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात झाडाभोवती मातीत मिसळावे. किडग्रस्त शेंडे/ पाने नष्ट करावीत. शेतामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा.<br>• टोमॅटो, वांगी, मिरची पिकावर पांढरी माशी, तुडतुडे, मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मॅलेथीऑन २० मि.ली. किंवा डायमेथोएट १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• फळबाग रोपवाटिकेस, नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला पिकास पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• दिवसाच्या कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने कोंबड्यांचे व जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करावे.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**